# भविष्य निर्वाह निधि अधिनियम,

# ( सन १९२५ चा अधिनियम क्रमांक १९ )

----------

[२७ ऑगस्ट, १९२५]

शासकीय व इतर भविष्य निर्वाह निधि यांच्याशी संबंधित असलेल्या कायद्यात विशोधन करण्यासाठी व तो एकत्रित करण्यासाठी अधिनियम

**ज्याअर्थी**, शासकीय व इतर भविष्य निर्वाह निधि यांच्याशी संबंधित असलेल्या कायद्यात विशोधन करणे व तो एकत्रित करणे इष्ट आहे;

**त्याअर्थी**, याद्वारे पुढील प्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे:

१. संक्षिप्त नाव व्याप्ती व प्रारंभ:

(१) या अधिनियमास " भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५" असे म्हणता येईल

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीज करून संपूर्ण भारतावर राहील.

(३) केंद्र सरकार, शासकीय राजपत्रात प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेद्वारे जो दिनांक नेमून देईल त्या दिनांकास तो अंमलात येईल.

## २. **व्याख्या:**

विषय किंवा संदर्भ यात काहीही प्रतिकूल नसेल तर, या अधिनियमामध्ये -

(क) "सक्तीची ठेव" या शब्द प्रयोगाचा अर्थ, एखाद्या भविष्य निर्वाह निधित दिलेली वर्गणी, किंवा त्यात ठेवलेली ठेव जी, एखाद्या आयुर्विमा पत्राच्या संबंधातील विम्याचा हप्ता भरण्याच्या किंवा एखाद्या कौटुंबिक निवृति वेतन निधीच्या संबंधातील वर्गणी देण्याच्या किंवा हप्ता भरण्याच्या प्रयोजना व्यतिरिक्त अन्य एखादी विशिष्ट आकस्मिक घटना घडून आल्याशिवाय त्या भविष्य निधीच्या नियमांनुसार मागणी केली असता जी देता येत नाही अशी वर्गणी किंवा ठेव, असा आहे आणि, त्यात कोणतेही अंशदान व अशा कोणत्याही वर्गणीवर, ठेवीवर किंवा अंशदानावर त्या निधीच्या नियमांनुसार उपार्जीत झालेल्या कोणत्याही व्याजाची किंवा वाढीची रक्कम यांचा, तसेच अशी कोणतीही आकास्मीक घटना

घडल्यानंतर वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या जमा खाती शिल्लक असलेल्या वर्गणीच्या, ठेवीच्या, अंशदानाच्या, व्याजाच्या क्विंवा वाढीच्या अशा कोणत्याही रकमेचा सुध्दा समावेश होतो;

(ख) "अंशदान" याचा अर्थ निधीचे कामकाज चालविणा-या कोणत्याही प्राधिका-याने एखाद्या भविष्य निर्वाह निधीत भर घालणे, वर्गणी देणे किंवा ठेव ठेवने या मार्गाने जमा केलेली कोणतीही रक्कम किंवा त्या निधीतिल वैयक्तिक खात्यात जमा असलेली कोणतीही शिल्लक रक्कम असा आहे; आणि "अंशदायी भविष्य निर्वाह निधी" याचा अर्थ, ज्या भविष्य निर्वाह निधीच्या नियमांमध्ये अंशदान जमा करण्याची तरतूद केली असेल असा एखादा भविष्य निर्वाह निधी, असा आहे;

(ग) "अवलंबून असलेली व्यक्ती" याचा अर्थ, एखाद्या भविष्य निर्वाह निधीच्या मृत वर्गणीदाराचे किंवा एखाद्या ठेवीदाराचे पुढील नातेवाईक, म्हणजे पत्नी, पती, आई-वडील, मुल, अज्ञान भाऊ, अविवाहीत बहीण आणि त्याच्या मृत मुलाची विधवा पत्नी व मुल आणि जेथे वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या आई-वडीलांपैकी कोणीही हयात नसेल तर, त्याच्या वडीलांचे आई-वडील यांपैकी कोणताही नातेवाईक, असा आहे;

(घ) "शासकीय भविष्य निर्वाह निधी " याचा अर्थ, शासकीय सेवेत असलेल्या व्यक्ती किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये कामावर असलेल्या व्यक्ती किंवा केवळ शैक्षणिक प्रयोजनांकरिताच अस्तित्वात असलेल्या संस्थांमध्ये कामावर असलेल्या व्यक्ती यांचा कोणताही वर्ग किंवा कोणताही वर्ग यांसाठी शासनाचे सचिव, केंद्र सरकार, राज्याचे प्रतिनिधी किंवा कोणतेही राज्य शासन यांच्या प्राधिका-याद्वारे स्थापित केलेला, रेल्वे भविष्य निर्वाह निधी खेरिजकरून इतर कोणताही भविष्य निर्वाह निधी, असा आहे; आणि या अधिनियमातील शासनाच्या निर्देशांचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल;

(ड) " भविष्य निर्वाह निधी " याचा अर्थ, ज्या निधीत कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या कर्मचा-यांकडून वर्गण्या किंवा ठेवी स्वीकारल्या जातात व त्याच्या वैयक्तीक खात्यांत ठेवण्यात येतात, असा एखादा निधी, असा आहे आणि, त्यात कोणते अंशदान आणि अशा वर्गण्यांच्या, ठेवींच्या किंवा अंशदानाच्या रकमांवर निधीच्या नियमान्वये उपार्जीत होणा-या कोणत्याही व्याजाची किंवा वाढीची रक्कम यांचा समावेश होतो;

(च) "रेल्वे प्रशासन" याचा अर्थ -
(एक) युनायटेड किंग्डमच्या संसदेचा एखादा विशेष अधीनियम किंवा एखादा

भारतीय कायदा यां अन्वये किंवा शासनाशी केलेल्या संविदे अन्वये भारताच्या कोणत्याही भागात एखाद्या रेलवेचे किंवा ट्रामवेचे कामकाज चालविणारी कोणतीही कंपनी; किंवा

(दोन) केंद्र सरकारकडून किंवा एखाद्या राज्य शासनाकडून कामकाज चालविण्यात येत असलेल्या अशा कोणत्याही रेल्वेचा किंवा ट्रमवेचा व्यवस्थापक, -

असा आहे; आणि त्यात उपखंड (दोन) मध्ये निर्देशिलेल्या कोणत्याही बाबतीत यथास्थिती, केंद्र सरकार किंवा राज्य शासन यांचा समावेश होतो;

(छ) "रेल्वे भविष्य निर्वाह निधी " याचा अर्थ, एखाद्या रेलवे प्रशासनान त्याच्या कोणत्याही वर्गाच्या किंवा वर्गांच्या कर्मचा-याकरिता त्या प्रशासनाच्या प्राधिका-याने स्थापित केलेला एखादा भविष्य निर्वाह निधी, असा आहे.

३. सक्तींच्या ठेवींना संरक्षण:

(१) कोणत्याही शासकीय किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीतील सक्तीची ठेव ही, कोणत्याही प्रकारे अभिहस्तांकित किंवा भारित करता येणार नाही आणि अशी रक्कम, वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने काढलेल्या कोणत्याही ऋणाच्या किंवा पत्करलेल्या कोणत्याही दायित्वाच्या संबंधात कोणत्याही दिवाणी, महसुली किंवा फौजदारी न्यायालयाच्या कोणत्याही हूकूमनाम्यान्वये किंवा आदेशान्वये जप्त होण्या योग्य नसेल, आणि "प्रांतिक नादारी अधिनियम, १९२०" अन्वये नियुक्त केलेल्या एकतर कोणत्याही पदस्थ अभिहस्तांकित किंवा कोणत्याही प्रापक अशा कोणत्याही सक्तीच्या ठेवीसाठी कोणत्याही प्रकारे हक्कदार असणार नाही किंवा त्याला त्याबाबत कोणताही दावा सांगता येणार नाही.

(२) अशा कोणत्याही निधीतील कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती त्याच्या मृत्यूच्या वेळी जी रक्कम जमा असेल आणि अशा निधीच्या नियमान्वये त्या वर्गणीदारावर किंवा ठेवीदारावर अवलंबून असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, किंवा त्याच्या वतीने अशा रकमेचे प्रदान घेण्यास कायद्याद्वारे प्राधिकृत करण्यात येईल त्या व्यक्तीस प्रदेय असणारी अशी कोणतीही रक्कम, या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही वजावटीच्या अधीन राहून, आणि जेथे अवलंबून असणारी व्यक्ती ही, वर्गणीदाराची किंवा ठेवीदाराची विधवा पत्नी किंवा मुल असेल ते खेरीजकरून, तसेच, या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी केलेल्या अभिहस्तांकनान्वये अभिहस्तांकितिच्या हक्कांच्या अधीन राहून अवलंबून असलेल्या व्यक्तीकडे निहित होईल आणि उपरोक्त गोष्टींच्या अधीन राहून अशी रक्कम ही, मृत वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने घेतलेल्या ऋणापासून किंवा पत्करलेल्या अन्य

दायित्वापासून किंवा अशा वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्यूपूर्वी त्याच्यावर अवलंबून असणा-या व्यक्तीने घेतलेल्या ऋणापासून किंवा पत्करलेल्या अन्य दायित्वापासून मुक्त असेल.

४. <u>परतफेड करण्याबाबतच्या तरतुदी.</u>

(१) कोणत्याही शासकीय किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीच्या नियमान्वये कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम किंवा या अधिनियमाद्वारे प्राधिकृत केलेली कोणतीही रक्कम वजा केल्यानंतर राहीलेली शिल्लक रक्कम प्रदेय होईल तेव्हा, अशी रक्कम देणे ज्याचे कर्तव्य आहे असा अधिकारी, ती रक्कम किंवा यथास्थीती शिल्लक रक्कम, अशा वर्गणीदारास किंवा ठेवीदारास देईल, किंवा, तो मरण पावला असेल, तर तो अधिकारी,

(क) जर ती रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा तिचा कोणताही भाग कलम 3 च्या तरतुदीन्वये अवलेबून असणा-या व्यक्तीकडे निहित असेल तर, ती रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा तिचा भाग त्याच्यावर अवलंबून असलेल्या व्यक्तीस किंवा तिच्या वतीने त्या रकमेचे प्रदान मिळण्यास कायद्याद्वारे प्राधिकृत करण्यात येईल अशा व्यक्तीस देईल; किंवा

(ख) जर संपूर्ण रक्कम किंवा यथास्थिति शिल्लक रक्कम पाच हजार रूपयांपेक्षा अधिक नसेल तर, अशी रक्कम किंवा खंड(क) अन्वये जि प्रदेय नसेल असा तिचा कोणताही भाग, निधीच्या नियमांन्वये ती रक्कम मिळण्यास नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीस देईल, किंवा जर अशारीतीने कोणत्याही व्यक्तीला नामनिर्देशित केले नसेल तर, अशी रक्कम मिळण्यास, अन्यथा जी हक्कदार असल्याचे त्या अधिका-यास वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस देईल; किंवा

(ग) कोणतीही रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा खंड (क) किंवा खंड (ख) अन्वये जो प्रदेय नसेल असा कोणताही भाग याबाबत तो अधिकारी, ती रक्कम किंवा शिल्लक रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, -

(एक) निधीच्या नियमांन्वये ती रक्कम, घेण्यास नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीने, मृत व्यक्तीच्या इस्टेटीचा कारभार तिच्याकडे देण्यात आल्याच्या पुराव्यादाखल मृत्यूपत्र

प्रमाण किंवा प्रशासनपत्र किंवा त्या धारकास अशा रकमेचे, शिल्लक रक्कमेचे किंवा तिच्या कोणत्याही भागाचे प्रदान स्वीकारण्यास हक्कदार ठरविणारे असे "उत्तराधिकार प्रमाणपत्र अधिनियम, १८८९" (१८८९ चा ७) अन्वये किंवा सन १८२७ चा मुंबई विनियम आठ या अन्वये दिलेले प्रमाणपत्र सादर केल्यावर त्या व्यक्तीस देईल; किंवा

(दोन) कोणतीही व्यक्ती नामनिर्देशित करण्यात आली नसेल तर, असे मृत्यूपत्र प्रमाण, किंवा प्रशासनपत्र किंवा प्रमाणपत्र सादर करणा-या कोणत्याही व्यक्तीला देईल:

परंतु, वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेली संपूर्ण रक्कम किंवा कोणत्याही रकमेचा कोणताही भाग या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी अन्य कोणत्याही व्यक्ती कडे अभिहस्तांकित करण्यात आला असेल आणि अभिहस्तांकितीकडून त्या अभिहस्तांकनाची लेखी नोटीस अधिका-यास मिळाली असेल तर, असा अधिकारी, या अधिनियमान्वये प्राधिकृत केलेली कोणतीही वजावट केल्यानंतर आणि वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या विधवा पत्नीस किंवा मुलांना किंवा त्यांच्या वतीने खंड (क) अन्वये देय असलेली रक्कम;

(एक) जर वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने, किंवा तो मरण पावला असल्यास असे कोणत्याही विधिग्राह्य अभिहस्तांकनाच्या अभावी या पोट-कलमान्वये अशी रक्कम किंवा शिल्लक रक्कम ज्या व्यक्तीला प्रदेय झाली असती त्या व्यक्तीने लेखी संमती दिली तर, ती संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, यथास्थिती - त्यापैकी शिल्लक रक्कम अभिहस्तांकितीस देईल; किंवा

(दोन) जर अशी संमती देण्यात आली नाही तर ती रक्कम तिचा भाग किंवा यथास्थीती शिल्लक रक्कम मिळण्यास हक्कदार असणा-या व्यक्तीच्या संबंधी सक्षम दिवाणी न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत त्या रकमेचे, तिच्या भागाचे, किंवा यथास्थीती शिल्लक रकमेचे प्रदान रोखून ठेवील.

(२) पोटकलम (१) अन्वये प्राधिकृत केलेली कोणतीही रक्कम प्रदान करण्यात आल्यावर, वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेल्या रकमेतून जितकी

रक्कम देण्यात आली असेल तितक्या समतुल्य रकमेच्या सर्व दायित्वातून शासन किंवा यथास्थिति, रेल्वे प्रशासन संपूर्ण मुक्त हिईल.

५. <u>नामनिर्देशित व्यक्तींचे हक्क</u>

(१) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहिही अंतर्भूत केलेले असले तरी अथवा एखाद्या शासकीय किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीच्या एखाद्या वर्गणीदाराने किंवा ठेवीदाराने निधीत त्याच्या खाती जमा असलेली रक्कम किंवा तिच्या कोणताही भाग या संबंधात केलेल्या कोणत्याही विनियोग व्यवस्थेत मग ती मृत्युपत्रानुसार केलेली असो किंवा अन्यथा इतर प्रकारे केली असो काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अशी रक्कम प्रदेय होण्यापूर्वी किंवा देय झाल्यानंतर ती देण्यात येण्यापूर्वी वर्गणीदाराचा किंवा ठेवीदाराचा मृत्यू घडून आल्यास ती संपूर्ण रक्कम, किंवा तिचा कोणताही भाग मीळण्याचा हक्क कोणत्याही व्यक्तीस प्रदान केला जाणे अभिप्रेत असल्याचे जेवव्हा अशा निधीच्या नियमा अनुसार यथोचितरीत्या केलेल्या कोणत्याही नामनिर्देशनावरून दिसून येईल तेव्हा, अशा वर्गणीदाराचा किंवा ठेवीदाराचा पूर्वोक्ताप्रमाणे मृत्यू झाल्यास इतर सर्व व्यक्तींना वगळून उक्त व्यक्ती अशी रक्कम किंवा यथास्थीती तिचा भाग मिळण्यास हक्कदार राहील मात्र, -

(क) अशा नामनिर्देशनात त्याच रीतीने केलेल्या अन्य नामनिर्देशनांद्वारे कोणत्याही वेळी बदल करण्यात आलेले नसावे किंवा त्या नियमांन्वये विहित केलेल्या रीतीने व विहित केलेल्या प्राधिका-यास नोटीस देउन ते स्पष्टपणे रद्द केलेले नसावे, किंवा

(ख) असे नामनिर्देशन, त्यात विनिर्दिष्ट केलेली एखादी आकस्मीक घटना घडून आल्यामुळे कोणत्याही वेळी विधिअग्राह्य झालेले नसावे, आणि - जर उक्त व्यक्ती, वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या मृत्यूपूर्वीच मरण पावली असेल तर, असे नामनिर्देशन उक्त व्यक्तीस प्रदान केलेल्या हक्कांशी जेथवर संबंधित असेल तेथवर, ते नामनिर्देशन रद्दबातल ठरेल व निष्परिणामक होईल;

परंतु, जेव्हा निधीच्या नियमां अनुसार नामनिर्देशनात मृत व्यक्ती ऐवजी अन्य एखाद्या व्यक्तीस असा हक्क प्रदान करण्याविषयी यथोचितरीत्या तरतूद करण्यात आली असेल तेव्हा, वर सांगितल्या प्रमाणे उक्त व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर तो हक्क अशा दुस-या व्यक्तीकडे जाईल.

(2) भारतीय उत्तराधिकार अधिनियम, १९२५ किंवा सन १९२५ चा ३९ चा मुंबई विनियम आठ यात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या व्यक्तीस वर सांगितल्या प्रमाणे हक्कदार ठरलेल्या अशा कोणत्याही व्यक्तीस, तिला अशी रक्कम किंवा तिचा भाग याचे प्रदान करण्यास हक्कदार ठरविणारे एक प्रमाणपत्र त्या अधिनियमान्वये किंवा यथास्थिति, त्या विनियमान्वये देण्यात येईल आणि असे प्रमाण पत्र हे मृत व्यक्तीच्या इस्टेटीच्या संबंधातील मृत्यूपत्र प्रमाण किंवा प्रशासन पत्र एखाद्या व्यक्तीला देण्यात आल्यामुळे विधिअग्राह्य ठरल्याचे किंवा ते निष्प्रभावित झाल्याचे समजण्यात जाणार नाही.

(३) भविष्य निर्वाह निधि (सुधारणा) अधिनियम, १९४६ याच्या कलम २, पोट कलम (१) अन्वये सुधारणा केल्याप्रमाणे या कलमाच्या तरतुदी, त्या अधिनियमाच्या प्ररंभाच्या दिनांका पूर्वी करण्यात आलेल्या सर्व नामनिर्देशनांना देखील लागू होतील:

परंतु, अशाप्रकारे सुधारणा करण्यात आलेल्या या कलमाच्या तरतुदी या ज्या प्रकरणात उक्त दिनांकापूर्वी कोणतीही रक्कम देण्यात आली असेल किंवा त्या नियमानुसार योग्यरीत्या केलेल्या कोणत्याही नामनिर्देशना अनुसार निधीच्या नियमांन्वये देय झाली असेल अशा कोणत्याही प्रकरणात बाधक ठरणार नाहीत.

६. <u>वजाती करण्याचा अधिकार:</u>

जो अंशदायी भविष्य निर्वाह निधी आहे अशा कोणत्याही शासकीय किंवा रेल्वे भविष्य निर्वाह निधीत कोणत्याही वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खाती जमा असलेली रक्कम जेव्हा प्रदेय होईल तेव्हा, निधीच्या नियमांमध्ये याबाबतीत विनिर्दीष्ट केलेल्या प्राधिका-याने जर असे निर्देशीत केले असेल तर, त्या जमा रकमेतून, -

(क) वर्गणीदार किंवा ठेवीदार यांच्याकडून पत्करलेल्या एखाद्या दायित्वामुळे शासनास किंवा रेल्वे प्रशासनास देय असलेली परंतू कोणत्याही प्रकरणी वर्गणीदाराच्या किंवा ठेवीदाराच्या खात्यात जमा करण्यात आलेल्या कोणत्याही अंशदानाच्या आणि अशा अंशदानावर उपार्जित झालेल्या कोणत्याही व्याजाच्या किंवा वाढीच्या एकूण रकमे पेक्षा अधिक नसेल अशी रक्कम; किंवा

(ख) निधीच्या नियमामध्ये या बाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणांसाठी वर्गणीदारास किंवा ठेवीदारास त्याच्या नोकरीतून बडतर्फ करण्यात आले असेल किंवा

त्याने त्याच्या नोकरीस प्रारंभ झाल्यापासून पाच वर्षांच्या आत अशा नोकरीचा राजीनामा दिला असेल त्या बाबतीत, अशा कोणत्याही अंशदानाची, व्याजाची व वाढीची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भाग, वजा करता येईल व ती रक्कम शासनास किंवा रेल्वे प्रशासनास देता येईल.

७. <u>सद्भावना पूर्वक केलेल्या कृत्यांना संरक्षण:</u>

या अधिनियमा खाली सद्भावपूर्वक केलेल्या किंवा केल्याचे अभीप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल कोणत्याही व्यक्ती विरुध्द कोणताही दावा किंवा अन्य वैध कार्यवाही केली जाणार नाही.

८. भविष्य निर्वाह निधीला हा अधिनियम लागू करण्याचा अधिकार

(१) समूचित शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, या अधिनियमाच्या तरतुदीचा स्थानिक प्राधिकरण कर्जे अधिनियम, १९१४ याच्या १९१४ चा ९ अर्थानुसार कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने आपल्या कर्मचा-यांच्या लाभासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही भविष्य निर्वाह निधीस लागू होतील; आणि असे घोषित केल्यावर, हा अधिनियम असा भविष्य निर्वाह निधी हा जणू काही शासकीय भविष्य निर्वाह निधी आहे अणि असे स्थानिक प्राधिकरण हे शासन आहे असे समजून लागू होईल.

(२) समुचित शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे असा निदेश देउ शकेल की, या अधिनियमांच्या तरतुदी या अनुसूचित विनिर्दिष्ट केलेल्या संस्थांपैकी कोणत्याही संस्थेच्या कर्मच्या-यांच्या किंवा अशा संस्थांच्या कोणत्याही गटाच्या लाभासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही भविष्य निर्वाह निधीस लागू होतील आणि असे घोषित केल्यावर हा अधिनियम असा भविष्य निर्वाह निधी हा जणूकाही शासकीय भविष्य निर्वाह निधी आहे आणि निधीचा अभिरक्षा करणारे प्राधिकरण हे शासन आहे असे समजून लागू होईल.

परंतु, कलम ६ मध्ये निर्दिष्ट केल्या प्रमाणे अंशदाने देणारे प्राधिकरण जणू काही शासन असल्या प्रमाणे ते कलम लागू होईल.

(३) समुचित शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही सार्वजनिक संस्थेचे नाव अनुसूचीत दाखल करता येईल, आणि अशी कोणतीही भर जणू काही ती या अधिनियमाद्वारे घातली होती असे समजून त्याप्रमाणे परिणामक्षम होईल;

(४) या कलमात "समुचित शासन" याचा अर्थ, -

(क) एखाद्या छावणी प्राधिकरणाच्या किंवाएखाद्या प्रमुख बंदराच्या बंदर प्राधिकरणाच्या बाबतीत आणि केंद्र सरकारच्या मते जी संस्था किंवा ज्या संस्थेची उद्दिष्टे, संविधानाच्या सातव्या अनुसूचितील १ ल्या सूचीच्या कक्षेतील असतील त्या संस्थेच्या बाबतीत केंद्र सरकार; आणि

(ख) इतर बाबतीत, राज्य शासन, असा आहे.

स्पष्टीकरण: सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी झालेल्या एखाद्या संस्थेच्या संबंधात "राज्य शासन" याचा अर्थ, ज्या राज्यात संस्थेची नोंदणी झाली असेल त्या राज्याचे "राज्य शासन", असा आहे,

९. सैनिकांच्या इस्टेटींच्या संबंधात व्यक्ती

ज्या कोणत्याही इस्टेटीचा कारभार चालविण्याच्या संबंधात "रेजिमेंटल ऋणे अधिनियम, १८९३" (व्हिक्टो सीएस ५६ व ५७) लागू होतो अशा कोणत्याही इस्टेटीच्या असणा-या पैशास कलम ४ किंवा कलम ५ यामधील कोणत्याही बाबी लागू असणार नाही.

१०. [निरसने] "निरसन अधिनियम, १९२७" (१९२७ चा १२), कलम २ व अनुसूचि यांद्वारे निरसित.

-------------

अनुसूची

संस्थांची सूची

[कलम ८, पोटकलम (२) पहा]

| | |
|---|---|
| १. | पाश्चर इन्स्टिटयूट ऑफ इंडीया, कसौली. |
| २. | कलकत्ता, सुधार न्यायाधिकरण |
| ३. | पाल्याधिकरण (कोर्ट ऑफ वार्डस) |
| ४. | भारतीय मध्यवर्ती कापूस समिती |
| ५. | मनोविकाराच्या रोग्यांकरिता असलेले युरोपियन रूग्णालय, राची यांचे विश्वस्त मंडळ |
| ६. | भारतातील महिलांना स्त्रीयांविषयक वैद्यकीय सहाय्य देण्यासाठीची राष्ट्रीय संघटना |
| ७. | संविधी द्वारे प्रस्थापित झालेल्या विद्यापीठाशी संलग्न असलेले महाविद्यालय |
| ८. | भारतीय कोळसा प्रतवारी मंडळ |
| ९. | लेडी मिंटो भारतीय नर्सिंग संघटना |
| १०. | भारतीय रेड क्रॉस सोसायटी |
| ११. | भारतीय लाखउपकर समिती |
| १२. | भारतीय रेड क्रॉस सोसायटीची मद्रास राज्य शाखा |
| १३. | भारताची इंपिरेअल बँक |
| १४. | बिहार आणि ओरिसा वैद्यकीय परीक्षा मंडळ |
| १५. | **** |
| १६. | "चहा जिल्हे उत्प्रवासी कामगार अधिनियम, १९३२" अन्वये उत्प्रवासी कामगारांच्या नियंत्रणा करीता निर्माण करण्यात आलेली संस्था. |
| १७. | फिल्म सेंसॉर मंडळ मुंबई |
| १८. | कलकत्ता विद्यापीठ |

* **वगळण्यात आले**

| | |
|---|---|
| १९. | मध्यवर्ती पाटबंधारे मंडळ |
| २०. | भारतीय रिजर्व बँक |
| २१. | **** |
| २२. | बनारस हिन्दु विद्यापीठ |
| २३. | भारतीय वैद्यकीय परिषद |
| २४. | भारतीय कॉफी उपकर समिती |
| २५. | अँग्लो इंडीयन व युरोपियन शिक्षणासाठी आंतरराज्य मंडळ |
| २६. | भारतीय संशोधन निधी संघटना |
| २७. | दिल्ली जल व मल प्रवाह संयुक्त मंडळ |
| २८. | भारतीय क्षयरोग संघटना |
| २९. | कोल माइन्स स्टोईंग बोर्ड |
| ३०. | भारतीय रेल्वे स्लीपर पूल गट समिती |
| ३१. | भारतीय कॉफी पणन विस्तार मंडळ |
| ३२. | कोळसा खाणी बचाव केंद्र समिती |
| ३३. | भारतीय कॉफी बोर्ड |
| ३४. | **** |
| ३५. | भारतीय रबर मंडळ |
| ३६. | भारतीय मध्यवर्ती उस समिती |
| ३७. | अखील भारतीय पशुप्रदर्शन समिती |
| ३८. | कोळसा खाण कामगार कल्याण निधी |
| ३९. | भारतीय नारळ समिती |
| ४०. | भारतीय मध्यवर्ती तंबाखू समिती |

* **वगळण्यात आले**

| | |
|---|---|
| ४१. | राज्य कामगार विमा महामंडळ |
| ४२. | भारतीय चहा अनुज्ञाप्ति समिती |
| ४३. | कोळसा खाणी (जतन करने व सुरक्षा) अधिनियम, १९५२ अन्वये प्रस्थापित झालेले कोळसा मंडळ |
| ४४. | मार्ग परिवहन प्राधिकरण, नवी दिल्ली |
| ४५. | मध्यवर्ती चहा मंडळ |
| ४६. | भारतीय मध्यवर्ती तेलबिया समिती |
| ४७. | केंद्रीय देशी वैद्यकीय पध्दती संशोधन संस्था |
| ४८. | भारतीय मानक संस्था, दिल्ली |
| ४९. | सुती वस्त्र निर्माण निधी समिती |
| ५०. | देशबंधु महाविद्यालय, कल्काजी |
| ५१. | दामोदर खोरे महामंडळ |
| ५२. | केंद्रीय रेशीम मंडळ |
| ५३. | विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली |
| ५४. | खादी व ग्रामोद्योग आयोग |
| ५५. | लॉरेन्स स्कूल (सनवार) सोसायटी |
| ५६. | कलावती सरण बाल रूग्णालय, नवी दिल्ली |

---------

भारत सरकार
सागरी विभाग
------------
निर्णय क्र.९६६-१४४२
बॉम्बे कॅसल, १५ डिसेंबर, १९२६

सचिव, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट यांच्याकडून आलेले पत्र क्र.३१२५, दि. ३० जुलै, १९२६

"भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ (१९२५ चा एकोणीस) याच्या तरतुदी अणि विश्वस्त मंडळाने त्यांच्या निर्णय क्र.३९४ दि. १३ जुलै, १९२६ अन्वये मान्य केलेल्या तरतुदींना धरून १ एप्रिल, १९२६ पासून सुधारित केलेल्या बॉम्बे पोर्ट ट्रस्ट स्थायी व अस्थायी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी यांच्या प्रती यासोबत पाठविण्याचे आणि उक्त अधिनियमाच्या कलम ८ च्या तरतुदिंअन्वये मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधीला नवीन भविष्य निर्वाह निधी अधिनियमाच्या तरतुदी लागू करता येतील, याबाबत शासनाकडे विचारणा करण्याचे मला निदेश देण्यात आलेले आहेत.

मी असे नमूद करतो की, भविष्य निर्वाह निधी अधिनियम (१८९७ चा ९) (आता तो नवीन अधिनियमाद्वारे रद्द करण्यात आला आहे) याच्या तरतुदी, शासन निर्णय, सागरी विभाग क्र.१३, २६ जानेवारी, १८९८ अन्वये बॉम्बे पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधीस लागू करण्यात आल्या होत्या".

महालेखापाल यांना ज्ञापन दि. २१ ऑगस्ट, १९२६

महालेखापाल यांच्याकडून ज्ञापन क्र.डी.ए.८.३३३, दिनांक २५ सप्टेंबर, १९२६. विधिकार्य परामर्शी यांना ज्ञापन दि. ८ नोहेंबर, १९२६

विधिकार्य परामर्शी यांचे कडून ज्ञापन क्र.२७८७, दिनांक २३ नोहेंबर, १९२६

निर्णय - भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ (१९२५ चा एकोणीस) याच्या कलम ८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, गव्हर्नर इन कौंसिल यांना उक्त अधिनियमाच्या तरतुदी बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या भविष्य निर्वाह निधीस लागू करण्यात आनंद होत आहे.

२. बॉम्बे शासकीय राजपत्रात आवश्यक ती अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येईल.

गव्हर्नर इन कौंसिल यांच्या आदेशाद्वारे
ए. एच. धाक्रु

शासनाचे अवर सचिव

बॉम्बे शासकीय राजपत्र भाग - एक, दिनांक १६.१२.१९२६, पृष्ठ क्रमांक २७४२ मधील बॉम्बे शासन सागरी विभाग अधिसूचना क्र.९६६/१७८६ दि.१५.१२.१९२६ ची प्रत.

भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ (१९२५ चा एकोणीस) याच्या कलम ८ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, गव्हर्नर इन कौंसिलला निदेश देण्यास आनंद होत आहे की, उक्त अधिनियमाच्या तरतुदी. बॉम्बे पोर्ट ट्रस्टच्या विश्वस्त मंडळाद्वारे त्यांच्या कर्मचा-यांच्या लाभासाठी स्थापन केलेल्या भविष्य निर्वाह निधीला लागू होतील.

-------------

## परिशिष्ट 'ख'

(नियम १० पहा)

कर्मचारी किंवा त्यांच्या विधवा आणि/किंवा
मुले याच्या भविष्य निर्वाह निधी मध्ये विशेष
अंशदान देण्यासाठीचे नियम

--------

[१][१(क) खालिल नमुद केलेल्या कोणत्याही परीस्थितींमध्ये, जी सेवा सोडतेवेळी रू[२][६५०] इतक्या कमाल वेतन श्रेणीवर असेल अशा कर्मचा-याबाबत, विशेष अंशदान हे १५ महिन्यांचे कमाल वेतन किंवा रूपये *३५,००० यांपैकी जी कमी असेल त्या रकमेच्या अधीन राहून, अखंडीत सेवा पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी एका महिन्याच्या वेतनाच्या निम्या दराने अनुज्ञेय असेल:-

(क) ३० वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंडित सेवा पूर्ण केल्यावर, किंवा

(ख) वयाची ५० वर्षे पूर्ण केल्यावर किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, किंवा

(ग) वयाची [३][५०] वर्षे पूर्ण केल्यावर किंवा कर्मचा-याला लागू असणा-या सेवा नियमांच्या अनुसार [४][समुचित] प्राधिकरणाने बजावलेल्या एका नोटिशीद्वारे त्यानंतर कोणत्याही वेळी सेवा सोडून जाणे भाग पाडले असल्यास, किंवा

(घ) सेवानिवृत्तीचे नियत वयोमानपूर्ण केल्यावर किंवा प्रमाणीत केलेल्या कायमस्वरूपी शारीरिक किंवा मानसिक अक्षमते मुळे सेवानिवृत्त होण्यास भाग पाडले असल्यास, किंवा

(ड) मंडळाच्या सेवेत त्याच्याकरिता कोणताही योग्य रोजगार आढळून न आल्याने त्याची नियुक्ती रद्द केल्यामुळे, त्याला सेवानिवृत्त होणे भाग पडले असल्यास; किंवा

---

१. सन १९६७ चा टी आर क्र११७४ द्वारे दाखल करण्यात आले (दि.१.८.१९६७ रोजी व तेव्हापासून)

२. सन १९७७ चा टी आर क्र११९३ द्वारे दाखल करण्यात आले (दि.१.१.१९६९ रोजी व तेव्हापासून)

३. } १९७५ चा टी आर क्र. ४६९ द्वारे दाखल करण्यात आले
४. } दि.१५.१.१९७६ रोजी व तेव्हा पासून

* वेळोवेळी सुधारित केले.

परंतु असे की, वरील खंड (ख) ते खंड (ग) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही परिस्थिती मध्ये सेवा सोडतेवेळी एखाद्या कर्मचा-याची अखंडित सेवा १५ वर्षांनी कमी पडत असल्यास, देय असलेले कमाल विशेष अंशदान, सहा महिन्यांच्या वेतनापेक्षा अधिक नसेल.

**(ख)** एखाद्या कर्मचारी मंडळाच्या सेवेत असताना मरण पावल्यास आणि ज्याचे त्याच्या मृत्यूसमयीचे वेतन श्रेणी कमाल ६५० रुपयांपेक्षा अधिक असेल अशा कर्मचा-याबाबत, त्याच्या खात्यामध्ये जमा करावयाचे विशेष अंशदान हे, शारीरिक किंवा मानसिक अक्षमतेमुळे त्याला जितके त्याला निवृत्त होण्यास भाग पाडल्यावर जितके अंशदान मिळण्यास तो पात्र ठरला असता तितकेच अंशदान त्याच्या खाती जमा करता येईल, परंतु, अशा एखाद्या कर्मचा-याचा मंडळाच्या सेवेची ५ वर्षे अखंडित सेवा पूर्ण केल्यानंतर मृत्यू झाल्यास, त्याच्या खाती जमा करावयाचे अंशदान हे रु३५००० इतक्या रकमेच्या कमाल मर्यादेच्या अधीन राहून, १२ महिन्यांच्या वेतनापेक्षा कमी नसेल.

**(ग)** विशेष अंशदानाचे प्रदान हे, चांगला कार्यक्षम कर्मचा-याच्या किंवा यथास्थिति दिवंगत कर्मचा-याच्या सर्व प्रकरणात त्याची सेवा चांगली, कार्यक्षम व निष्ठापूर्वक असल्याचे प्रमाणित केल्याच्या सशर्त असेल.

२. **(क)** खालील नमूद केलेल्या कोणत्याही परिस्थितींमध्ये जो सेवा सोडते वेळी ६५० रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या कमाल वेतन श्रेणी असल्यास अशा कर्मचा-याच्या बाबत विशेष अंशदान हे कमाल १५ महिन्यांच्या कमाल वेतनाच्या अधीन राहून, अखंडित सेवा पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी एका महिन्याच्या वेतनाच्या निम्म्या दराने अनुज्ञेय असेल:-

(क) ३० पेक्षा कमी नसेल इतकी अखंडित सेवा पूर्ण केल्यावर, किंवा

(ख) कर्मचा-याने वयाची ५५ वर्षे पूर्ण केल्यावर किंवा स्वेच्छेने सेवा सोडली आहे असो, किंवा कर्मचा-याला लागू असणा-या सेवा नियमांनुसार नियुक्ती प्राधिकरणाने दिलेल्या एखाद्या नोटिसीद्वारे त्याला सेवा सोडण्यास भाग पाडले आहे किंवा कसे हे लक्षात न घेता, त्यानंतर कोणत्याही वेळी; किंवा

(ग) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यावर किंवा कायमस्वरुपी शारीरिक किंवा मानसिक अक्षमता असल्याचे प्रमाणित केल्यामुळे निवृत्त होण्यास भाग पाडल्यावर; किंवा

(घ) त्याची नियुक्ती रद्द केल्यामुळे सेवानिवृत्त होण्यास भाग पाडले असल्यावर मंडळाच्या सेवेत त्याच्याकरिता कोणतीही इतर योग्य नोकरी अढळून आल्यामुळे; किंवा

(ङ) मंडळाच्या सेवेत त्याच्याकरिता कोणताही इतर योग्य रोजगार आढळून न आल्याने त्याची नियुक्ती रद्द केल्यामुळे त्याला सेवानिवृत्त होणे भाग पाडले असल्यास, किंवा

(च) १० वर्षांपेक्षा कमी नसेल इतकी अखंडीत सेवा पूर्ण केल्यानंतर मंडळाच्या सेवेतून राजीनामा दिल्यावर, सेवा सोडून दिल्यावर किंवा सेवेतून काढून टाकल्यावर, किंवा

(छ) १५ वर्षांपेक्षा कमी नसेल अशी अखंडितसेवा पूर्ण केल्यानंतर गैरवर्तना बाबतची शास्ती म्हणून मंडळाच्या सेवेतून बडतर्फ केल्यावर:

परंतु, वरील खंड (ख) ते (ङ) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही परिस्थितीमध्ये सेवा सोडतेवेळी एखाद्या कर्मचा-याची अखंडीत सेवा १५ वर्षांनी कमी पडत असल्यास, देय असलेले कमाल विशेष अंशदान हे सहा महिन्यांच्या वेतनापेक्षा अधिक नसेल:

परंतु असे की, ज्या कर्मचा-याला त्याची नियुक्ती रद्द करण्यात आल्यामुळे प्रमाणित केलेल्या कायमस्वरूपी शारीरिक व मानसिक अक्षमतेमुळे सेवानिवृत्त होणे भाग पाडले आहे आणि अशा सेवानिवृत्तीच्या वेळी ज्याची अखंडित सेवा १५ वर्षां पेक्षा कमी असेल अशा कर्मचा-याबाबत, विश्वस्त मंडळाला त्याच्या स्वेच्छाधिकारात, कमाल सहा महिन्यांच्या वेतनाच्या अधीन राहून, पूर्ण केलेल्या प्रत्येक सेवा वर्षासाठी एका महिन्याचे वेतन या दराने त्याला विशेष अंशदान मंजूर करता येईल:

परंतु अणखी असे की, पोर्ट ट्रस्टच्या आर्थिक तोटयात सहभागी असल्याच्या गैरवर्तनावरून ज्याला सेवेतून बडतर्फ केले आहे, अशा कर्मचा-याबाबत, अशा गैरवर्तनामुळे पोर्ट ट्रस्टला झालेल्या तोटयाची रक्कम, त्याला देय असणा-या विशेष अंशदानाच्या रकमेतून वजा करण्यात येईल आणि जर नंतरची रक्कम या प्रयोजनासाठी अपुरी ठरत असेल तर शिल्लक रक्कम, मंडळाच्या अंशदानातून अणि मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधी अधिनियमाच्या नियम ९ आणि ११ अन्वये त्याला देय होणा-या व्याजामधून वसूल केली जाईल.

(ख) जो ५ वर्षांची अखंडीत सेवा पूर्ण करण्यापूर्वी मंडळाच्या सेवेत असताना मरण पावला असेल अशा कर्मचा-याच्या बाबत आणि त्याच्या मृत्यूच्या वेळी कमाल ६५० रूपयांपेक्षा अधिक नाही अशा वेतनश्रेणीत असेल अशा कर्मचा-याबाबत, त्याच्या खात्यात जमा करावयाचे विशेष अंशदान हे सेवा पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी सर्वसाधारणपणे अर्ध्या महिन्याच्या वेतना इतके मर्यादित असेल; परंतु विशेष प्रकरणांमध्ये ते अंशदान परिस्थिति वरून खात्री होईल तेथे सेवा पूर्ण केलेल्या प्रत्येक वर्षासाठी एका संपूर्ण महिन्याच्या वेतनाइतके वाढविले जाईल;

परंतु असे की, जेव्हा असा कर्मचारी ५ वर्षांची अखंडित सेवा पूर्ण केल्यानंतर मंडळाच्या सेवेत असताना मरण पावला असल्यास हे त्याच्या खत्यात जमा करावयाचे विशेष अंशदान १२ महिन्यांच्या वेतनापेक्षा कमी नसेल.

(ग) वरील बाब क च्या खंड (च) द्वारे समावेश असणा-या प्रकरणां व्यतिरिक्त, विशेष अंशदानाचे प्रदान हे कर्मचा-याच्या किंवा यथास्थिति दिवंगत कर्मचा-याच्या बाबतीत त्याची सेवा चांगली, कार्यक्षम आणि निष्ठापूर्वक असल्याने प्रमाणित केल्याच्या सशर्त असेल.

३. एखाद्या कर्मचा-याच्या सर्व अधिकृत अनुपस्थितीच्या रजेसह पोर्ट ट्रस्ट मधील पूर्णवेळ संपूर्ण अखंडित सेवा ही विशेष अंशदानाचे ठरीव प्रमाण काढण्याचे प्रयोजन आणि विशेष अंशदानास पात्र ठरण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान कालावधीची परिगणना करण्याचे प्रयोजन या दोहोंसाठी हिशेबात घेतली जाईल.

परंतु असे की, "अ" प्रवर्गातील गोदी किनारा कामगारांच्या संबंधात, अशा कर्मचा-यांनी "ब" प्रवर्गातील किनारा मजदूर म्हणून आणि/किंवा टोळीवाल्यांसह केलेली पूर्वीची सेवाही, विशेष अंशदानासाठी पात्र ठरविण्यासाठी वरील नियम २ च्या बाब (क) मधील अनुक्रम खंड (ग) आणि (च) मध्ये विहीत केलेल्या किमान १० आणि १५ वर्षांचा किमान कालावधीची गणना करण्याच्या प्रयोजनासाठीचे केवळ विचारात घेण्यात येईल:

परंतु आणखी असे की, एखाद्या कर्मचा-याला कोणत्याही ‘नाकारलेल्या’ रजेच्या किंवा त्याला लागू असणा-या सेवा नियमांनुसार त्याला मंजूर करता येईल अशा कोणत्याही सेवानिवृत्ती पूर्व रजेच्या कालावधी हा त्याने नियत सेवानिवृत्तीचे वय पूर्ण केल्यानंतर किंवा त्यानंतर त्याला मंजूर करता येईल अशा वाढीव सेवेचा कालावधी संपल्यानंतर, या नियमांच्या प्रयोजनासाठी सेवा म्हणून हिशेबात घेतल्या जाणार नाही.

४. या परिशिष्टात अंतर्भूत असलेल्या नियमाच्या प्रयोजनार्थ,-

**(क)** जो सेवा सोडण्याच्या किंवा त्याच्या मृत्यूच्या वेळी रूपये ६५० या कमाल वेतनश्रेणीतील कायम क्षमतेचे एखादे पद धारण करीत असलेल्या कर्मचा-याच्या बाबतीत 'वेतन' याचा अर्थ, त्याचे कायम वेतन आणि कोणतेही असल्यास, वैयक्तिक वेतन [१][आणि वैद्यकीय कर्मचारी वर्ग असल्यास, त्या कायम धारण केलेल्या पदाला संलग्न असलेला, कोणताही असल्यास, व्यवसायरोध भत्ता, असा आहे.]

**(ख)** एखाद्या कर्मचारी सेवा सोडण्याच्या वेळी किंवा त्याच्या मृत्यूच्या वेळी, रु६५० इतक्या कमाल मर्यादेपेक्षा अधिक वेतन श्रेणी असलेले एखादे पद तातपुरते धारण करीत असलेल्या अशा कर्मचा-याच्या बाबतीत "वेतन" याचा अर्थ:-

(क) ज्याने सेवा सोडल्याच्या किंवा यथास्थिति, मंडळाच्या सेवेत असताना तो मृत्यू पावल्याच्या महिन्याच्या लगतपूर्वी पूर्ण केलेल्या बारा महिन्यांच्या कालावधी मध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधी नियमांच्या नियम ८ अन्वये त्याच्या भविष्य निर्वाह निधीत त्याने दिलेली अंशदानाची रक्कम; किंवा

(ख) [२][सेवा सोडण्याच्या वेळी किंवा यथास्थिति, त्याच्या मृत्यूच्या वेळी कर्मचारी अनुक्रमे जी रक्कम काढत होता किंवा रक्कम काढण्यास तो हक्कदार होता असे विश्वस्त मंडळाचे वेतन व भत्ते याबाबतचे सारसंग्रह, ९ वी आवृत्ती यातील अनुच्छेद ११(११) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कायम पद वेतन अधिक (+) त्याच सारसंग्रहाच्या अनुक्रमे अनुच्छेद ११(१३) अणि ११(१५) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणतेही असल्यास, वैयक्तिक वेतन आणि/ किंवा विशेष वेतन

१. १९६९ चा टी आर. क्र १२१० द्वारे समाविष्ट करण्यात आले.
२. १९७० चा टी आर. क्र ११९३ द्वारे दाखल करण्यात आले.(दि. १.१.१९६९ रोजी व तेव्हापासून)

असा महागाईभत्ता व पूरक (शहर) भत्ता, आणि (दोन) कोणत्याही

अन्नधान्य सवलतीचे किंवा मोफत शिध्याचे रोख मूल्य किंवा मोफत शिधा किंवा त्याच्या भाग या ऐवजी रोखीतील कोणतेही प्रदान]

यापैकी जे अधिक असेल ती रक्कम असा आहे.

**(ग)** एखादा कर्मचारी, सेवा सोडण्याच्या किंवा त्याच्या मृत्यूच्या वेळी रू६५० हून अधिक नसेल अशा कमाल वेतन श्रेणीतील एखादे पद धारण करीत होता, अशा कर्मचा-याबाबत, "वेतन" या शब्दाचा अर्थ:-

(क) मंडळाच्या सेवेत असताना ज्या महिन्यात त्याने सेवा सोडली किंवा यथास्थिति तो मृत्यू पावला त्या महीन्याच्या लगतपूर्वी पूर्ण केलेल्या बारा महिन्यांच्या कालावधी मध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधीच्या नियम ८ अन्वये त्याच्या भविष्य निर्वाह निधी मध्ये त्याने अंशदान दिलेली रक्कम;

(ख) [१][विश्वस्तमंडळ वेतन व भत्ते सारसंग्रह, ९वी आवृत्ती याच्या अनुच्छेद ११(११) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कायम पद वेतन आधिक (+) त्याच्या सेवा सोडण्याच्या वेळी किंवा यथास्थिति त्याच्या मृत्यूच्या वेळी तो कर्मचारी जी रक्कम काढत होता किंवा रक्कम काढण्यास हक्कदार होता अशा त्याच सारसंग्रहाच्या अनुक्रमे १ अनुच्छेद ११(१३) आणि ११(१५) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे वैयक्तिक वेतन

१. १९७० चा टी आर. क्र ११९३ द्वारे दाखल करण्यात आले. (दि. १.१.१९६९ रोजी व तेव्हापासून)

कोणतेही असल्यास विशेष वेतन यांबाबत योग्य असा महागई भत्ता आणि शहर पूरक भत्ता, (दोन) कोणत्याही अन्नधान्य सवलतीचे किंवा मोफत शिधा किंवा त्याचा भाग या ऐवजी रोखीने केलेले कोणतेही प्रदान; आणि तसेच (तीन) पुढील दराने संस्करण भत्ता:

| | | |
|---|---|---|
| ‘अ’ प्रवर्गातील गोदी किनारा मजदूर<br>मोरपियाज | | रूपये १६.१२ पै<br>रूपये १७.९४ पै |
| यारी चालक, जलीय, ५ आणि ६ टन व ३५ सिडब्ल्यूटी, आणि यारी चालक, विद्युत, ३ अणि ६ टन] | | रूपये १८.९८ पै |

यांपैकी जी अधिक असेल ती रक्कम, असा आहे.

(क) ज्याला नियतसेवा निवृत्तीचे वय पूर्ण केल्यानंतर किंवा त्याला देण्यात येईल अशी सेवावाढ समाप्त झाल्यानंतर नाकारलेली किंवा सेवानिवृत्ती नंतरची रजा देण्यात आली अहे अशा कर्मचा-याच्या बाबतीत, ज्या महिन्यात त्याची अशी नाकारलेली रजा किंवा सेवानिवृत्तीनंतरची रजा सुरू होते तो महिना त्याने सेवा सोडल्याचा महिना म्हणून गणण्यात येईल.

(ख) जो सेवा सोडण्याच्यावेळी किंवा यथास्थिति, त्याच्या मृत्यू समयी जो रजेवर असेल अशा कर्मचा-याबाबत, वरील नियम ४ च्या प्रयोजनार्थ जे कोणतेही कायम पद वेतन आणि वैयक्तिक वेतन आणि/किंवा कोणतेही असल्यास विशेष वेतन ज्या दिनांकास त्याला काढता आले असते परंतु त्या दिनांकास तो रजेवर असलेल्या कालावधीतील असे कायम पद वेतन व वैयक्तिक वेतन आणि/किंवा विशेष वेतन असेल, यामध्ये अशा दिनांकास तो कामावर असता तर ज्यासाठी हक्कदार ठरला असता अशा वेतनातील वाढीचा समावेश असेल.

(ग) एखाद्या अनुसूचित अस्थायी कर्मचा-याच्या किंवा एखाद्या बिगर अनुसूचीत स्थायी कर्मचा-याच्या बाबतीत नियम ४ च्या प्रयोजनार्थ, कायम पद वेतन आणि वैयक्तिक वेतन आणि/किंवा कोणते असल्यास विशेष वेतन, याचा अर्थ, त्याने नोकरी सोडल्याच्या दिनांकास किंवा त्याच्या मृत्यूच्या दिनांकास

त्याच्या स्वत:च्या पदावर त्याने जे कोणतेही वैयक्तिक आणि/किंवा कोणतेही असल्यास विशेष वेतन घेतले होते, असे वेतन किंवा तो रजेवर असताना त्यासाठी किंवा त्याने नोकरी सोडण्याच्या दिनांकास किंवा त्याच्या मृत्यूच्या दिनांकास दुसरे पद, पूर्णत: तात्पुरत्या तत्वावर किंवा हंगामी पदाच्या नात्याने धारण करण्यासाठी अशा पदावर त्याला घेता येईल अशा वेतनाचा समावेश असणारे वेतन, असा होतो. एखाधा कर्मचारी जो रजेवर आहे किंवा त्याने नोकरी सोडण्याच्या दिनांकास किंवा त्याच्या मृत्यूच्या दिनांकास त्याने आपल्या स्वत:च्या पदाव्यतिरिक्त दुसरे एखादे पद धारण केले आहे, अशा कर्मचा-याच्याबाबतीत त्याला स्वत:च्या पदावर असताना जे वेतन मिळाले असते अशा वेतनात, त्याला मिळाली असती अशा वेतनातील कोणत्याही वाढीचा, आणि अशा दिनांकास तो कामावर असताना व तो स्वत:च्या पदावर असताना त्याला जे वेतन मिळणार होते असे वैयक्तिक आणि/किंवा कोणतेही असल्यास विशेष वेतन यातील, कोणत्याही वाढीचा समावेश असेल.

अनुसूचित अस्थायी अणि बिगर अनुसूचित स्थायी कर्मचा-याच्या बाबतीत या टिप्पणीच्या प्रयोजनार्थ कोणते पद, कर्मचा-याचे स्वत:चे पद आहे असे समजण्यात यावे याबाबत कोणतीही शंका किंवा विवाद उद्‌भवल्यास या प्रश्नावरील अध्यक्षांचा निर्णय हा अंतिम असेल.

(घ) 'अ' प्रवर्गातील गोदी किनारा कामगार आणि यारी चालक, जलीय, ५ अणि ६ टन व ३५ सीडब्ल्यूटी अणि यारी चालक, विद्युत, ३ अणि ६ टन, यांचे बाबतीत वरील नियम ४ च्या प्रयोजनार्थ त्यांचे कायम पद वेतन याचा अर्थ, खालील नमूद केलेल्या वेतन श्रेणीतील त्याने सेवा सोडतेवेळी किंवा त्यांच्या मृत्यूसमयी असणारे त्यांचे वेतन, असा आहे:

| | १[प्रवर्ग | वेतन श्रेणी |
|---|---|---|
| १. | मजदूर | रुपये १०४२-११६-३-१३१-ईबी-८- ३-१४० |
| २. | मोरपियास व बास्ट | रुपये १२५-३-१३४-४-१७० |
| ३. | विशेष मोरपियास | रुपये १५०-४-१७०-५-१९० |
| ४. | कार्ट अँड वॅगन अनलोडर्स | रुपये १४६-४-१७०-५-१८५ |
| ५. | यारी चालक, जलीय, ५ व ६ टन ) | |
| ६. | यारी चालक, जलीय,३५ सीडब्ल्यूटी ) | रुपये१५०-४-१७०-५-१९७- ईबी-८-६-२२५] |
| ७. | यारीचालक, विद्युत ३ व ६ टन ) | |

१. १९७० चा टी आर. क्र ११९३ द्वारे दाखल करण्यात आले. (दि. १.१.१९६९ रोजी व तेव्हापासून)

**परिशिष्ट ग**

<u>**स्थायी कर्मचारी**</u>

## मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधी
## नामनिर्देशन पत्र

प्रति,
मुंबई पोर्ट ट्रस्ट,

मी, याद्वारे असा निदेश देतो, की माझ्या मृत्यूच्या वेळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या माझ्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा असलेली रक्कम खाली नमूद केलेल्या व्यक्तीला प्रदान करण्यात यावी/खाली नमूद केलेल्या व्यक्तींना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रीतीने वितरित करण्यात यावी.

मला पूर्णपणे माहीत आहे की, हे नामनिर्देशन भविष्य निर्वाह निधी नियमांतील नियम १० अन्वये अनुज्ञेय असणा-या विशेष अंशदानास लागू नाही.

| नामनिर्देशित व्यक्ती किंवा नामनिर्देशित व्यक्तींचे नाव व पत्ता | भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ याच्या कलम 2(ग) मध्ये व्याख्या केल्या प्रमाणे अवलंबून असलेली व्यक्ती आहे किंवा नाही जर अशी अवलंबून असणारी व्यक्ती असेल तर तिच्याशी असलेल्या नात्याचे स्वरूप | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | नामनिर्देशित व्यक्तीला द्यावयाची संचित रक्कम किंवा त्यातील हिस्सा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | |

* यामुळे माझ्या पूर्वीचे नामनिर्देशन निष्प्रभावित होत आहे.

(१) साक्षीदार ____________________
पत्ता ____________________
(२) साक्षीदार ____________________
पत्ता ____________________

स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा
धारण केलेले पद ____________________
ठिकाण ____________________
दिनांक ____________________

टीप: १. "अवलंबून असलेली व्यक्ती " याचा अर्थ एखाद्या वर्गणीदाराचे पुढीलपैकी कोणतेही नातेवाईक, म्हणजे, पत्नी, पती, आई-वडील, मूल, अज्ञान भाऊ, अविवाहित बहीण आणि एखाद्या मृत मुलाची विधवा पत्नी व मूल अणि जेथे एखाद्या वर्गणीदाराचे आई-वडील हयात नसतील तेथे, (पैतृक) वडीलांकडील आजी - आजोबा असा आहे.

२. नामनिर्देशित व्यक्ती अज्ञान असल्यास स्तंभ ३ मध्ये तीचा जन्म दिनांक नमूद करण्यात यावा.

३. स्तंभ ४ मध्ये जमा खाती असलेली संपूर्ण रक्कम नमूद करण्यात यावी

---

* आवश्यक नसेल ते खोडावे.

परिशिष्ट 'ग'

अनुसूचित अस्थायी कर्मचारी

अनुसूचित स्थायी

## <u>मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधी</u>
## <u>नामनिर्देशन पत्र</u>

प्रति,
मुंबई पोर्ट ट्रस्ट,

मी, याद्वारे असा निदेश देतो, की माझ्या मृत्यूच्या वेळी मुंबई पोर्ट ट्रस्टच्या माझ्या भविष्य निर्वाह निधी खात्यामध्ये जमा असलेली रक्कम खाली नमूद केलेल्या व्यक्तीला प्रदान करण्यात यावी/खाली नमूद केलेल्या व्यक्तींना त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रीतीने वितरित करण्यात यावी.

मला पूर्णपणे माहीत आहे की, हे नामनिर्देशन भविष्य निर्वाह निधी नियमांतील नियम १० अन्वये अनुज्ञेय असणा-या विशेष अंशदानास लागू नाही.

| नामनिर्देशित व्यक्तीचे किंवा नामनिर्देशित व्यक्तींचे नाव व पत्ता | भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९२५ या च्या कलम २(ग) मध्ये व्याख्या केल्या प्रमाणे अवलंबून असलेली व्यक्ती आहे किंवा नाही जर असेल तर तिच्याशी असलेल्या नात्याचे स्वरूप | नामनिर्देशित व्यक्तीचे वय | नामनिर्देशित व्यक्तीला द्यावयाची संचित रक्कम किंवा त्यातील हिस्सा |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| | | | |

* यामुळे माझ्या पूर्वीचे नामनिर्देशन निष्प्रभावित होत आहे.

| | | |
|---|---|---|
| (१) साक्षीदार ____________________<br>पत्ता ____________________ | | स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा<br>धारण केलेले पद ____________________ |
| (२) साक्षीदार ____________________<br>पत्ता ____________________ | | ठिकाण ____________________<br>दिनांक ____________________ |

<u>टीप:</u> १. "अवलंबून असलेली व्यक्ती " याचा अर्थ एखाद्या वर्गणीदाराचे पुढीलपैकी कोणतेही नातेवाईक, म्हणजे, पत्नी, पती, आई-वडील, मूल, अज्ञान भाऊ, अविवाहित

बहीण आणि एखाद्या मृत मुलाची विधवा पत्नी व मूल अणि जेथे एखाद्या वर्गणीदाराचे आई-वडील हयात नसतील तेथे त्याचे( पैतृक) वडीलांकडील आजी  आजोबा असा आहे.

२.	नामनिर्देशित व्यक्ती अज्ञान असल्यास स्तंभ 3 मध्ये तीचा जन्म दिनांक नमूद करण्यात यावा.

३.	स्तंभ ४ मध्ये जमा खाती असलेली संपूर्ण रक्कम नमूद करण्यात यावी

---

* आवश्यक नसेल ते खोडावे.

परिशिष्ट 'घ'

विश्वस्तमंडळ निर्णय क्रमांक ३१० चे परिशिष्ट

दिनांक २९ जून, १९४३

--------

अनुक्रमे स्थायी व अस्थायी कर्मचारी यांबाबत मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधी नियम यातील नियम २१ अन्वये क्षतिपूर्ती

-------

ज्याअर्थी मुंबई पोर्ट ट्रस्टचा (यात यानंतर त्याचा निर्देश "(ट्रस्टीज)" "विश्वस्त मंडळ" म्हणून करण्यात आला आहे) कर्मचारी व मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधीचा वर्गणीदार श्री______________ हा कर्मचारी दिनांक ___________________ रोजी उक्त (ट्रस्टीजच्या) विश्तस्त मंडळाच्या सेवेतून सेवानिवृत्त झाला आहे अणि ज्या अर्थी _____________ या उक्त कर्मचा-याचा अशा सेवानिवृत्तीच्या दिनांकास त्याचा कोणताही ठावठिकाण्याबाबत खात्री करून घेणे शक्य नसेल अणि अशा ठावठिकाण्याबद्दल विश्तस्त मंडळाचे समाधान होण्यासाठी चौकशी करून देखील अद्याप ठावटिकाण्याची खात्रीकरून घेता आली नाही आणि तो जीवंत आहे किंवा नाही या बद्दल काहीही माहित नाही आणि ज्याअर्थी उक्त __________ याने त्याच्या सेवानिवृत्तीपूर्वी निधीच्या नियमांनुसार त्याच्या भविष्य निर्वाह निधीसाठी नामनिर्देशन केले होते आणि अशा नामनिर्देशनाची मुख्य लेखपाल, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट यांच्या कार्यलयात नोंदणी करण्यात आली होती आणि ज्याअर्थी अशा नामनिर्देशना अन्वये _______________ उक्त कर्मचारी, विश्तस्त मंडळाच्या सेवेत असताना मृत्यू पावला असल्यास , __________________ या उक्त कर्मचा-याचा भविष्य निर्वाह निधी मिळण्यास _____________ आणि ______________________ ही व्यक्ती हक्कदार होती/व्यक्ती हक्कदार होत्या, आणि ज्याअर्थी भविष्य निर्वाह निधी नियम यातील नियम २१ अन्वये (ट्रस्टीजना) विश्तस्त मंडळाला त्यांच्या संपूर्ण स्वेच्छाधिकारात सेवा निवृत्तीच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या समाप्तीपर्यंत विश्तस्त मंडळ (ट्रस्टीज) वेळोवेळी निश्चित करील अशा दिनांकापर्यंत परंतु नियम २१ मध्ये केलेल्या तरतुदींना अधीन राहून, त्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे व्याज परिगणित करण्यास मुभा देण्याबाबतचे आणि नामनिर्देशित व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून त्या प्रयोजनार्थ अर्जानुसार आणि करून घेण्यात येणा-या क्षतिपूर्ति बंधपत्रानुसार वर्गणीदाराच्या नामनिर्देशित व्यक्तीला/व्यक्तींना, वेळोवेळी मुभा देण्यात येईल असे कोणतेही व्याज देण्याबाबतचे अधिकार प्रदान केलेले आहेत आणि ज्याअर्थी उक्त _____________ याच्या ____________ नामनिर्देशित व्यक्तीने/व्यक्तींनी नियम २१ अन्वये व्याजप्रदानासाठी (ट्रस्टीज) विश्तस्तमंडळाकडे अर्ज केलेला आहे आणि ज्याअर्थी उक्त ____________ याच्या असा नामनिर्देशित व्यक्ती/ अनेक नामनिर्देशित व्यक्ती म्हणून असणा-या उक्त __________ यांना, उक्त __________ यांच्या/ सेवानिवृत्तीच्या दिनांकानंतरच्या सहा महिन्यांचा कालावधी संपल्यापासून _______ यांच्या भविष्य निर्वाह निधीवरील ______ पासून ______ पर्यंत परिघणित केलेली उक्त ____________ व्याजाची रक्कम, निष्पादित केलेल्या बंधपत्रानुसार देण्यास/ विश्वस्त मंडळ इच्छूक आहे, त्याअर्थी, आता याद्वारे ________ मी/आम्ही असे वचन देतो/ मान्य करतो की, उक्त ________ व्यक्ती जीवंत असल्याचे कोणत्याही वेळी निष्पन्न झाल्यास मी/आम्ही

नियम २१ अनुसार आणि नंतर असेल त्या क्षतिपूर्ती नुसार (ट्रस्टीज) विश्वस्त मंडळाने मला/आम्हाला दिलेली व्याजाची रक्कम मागणी केल्यावर विश्वस्त मंडळाला मी/आम्ही त्यांना देऊ आणि अशा व्याजप्रदानाच्या कारणावरून (ट्रस्टीज) विश्वस्त मंडळ होऊ शकेल असा सर्व तो वादखर्च आकार व खर्च यांबाबतची रक्कम (ट्रस्टीज) विश्वस्त मंडळाला स्वत:कडे सुरक्षित ठेवून घेता येईल आणि मी/आम्ही याद्वारे अणखी असे देतो व मान्य करतो की, उक्त __________ च्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून सहा महीने संपल्यानंतर कोणत्याही दिनांकास जीवंत होता परंतू त्यानंतर त्याचा मृत्यू झाला आहे असे निष्पन्न झाल्यास, मी/आम्ही मृत्यूच्या दिनांकानंतरच्या कोणत्याही कालावधीसंबंधात अशाप्रकारे देण्यात आलेली व्याजाची सर्व रक्कम (ट्रस्टीज) विश्वस्त मंडळाला परत करेन/परत करू, आणि आणखी असे की, विश्वस्त मंडळाला अशा प्रकारे परतावा करण्यायोग्य असलेली अशी सर्व व्याजाची रक्कम, उक्त __________ कर्मचा-याचा मृत्यू झाल्याचे एखाद्या सक्षम न्यायालयाने सिध्द केल्यास किंवा गृहीत धरल्यास उक्त __________ कर्मचा-याचे मृत्यूवर मला/ आम्हाला देय होईल अशा भविष्य निर्वाह निधीच्या रकमेतून विश्वस्त मंडळाला वजा करता येईल.

या गोष्टीची साक्ष म्हणून मी/आम्ही ________ दि _____ माहे ________ १९_____ रोजी त्यावर स्वहस्ते स्वाक्षरी करीत आहे/ करीत आहोत

करतो

| उक्त द्वारे स्वाक्षरीत | यांच्या समक्ष |
|---|---|
| ____________ | ____________ |
| ____________ | ____________ |

---

परिशिष्ट ड व च

५ ऑक्टोबर, १९५६ चा टी आर क्र.९३७ द्वारे वगळण्यात आले (दि.५.१०.१९६५ रोजी तेव्हापासून)

परिशिष्ट 'छ'

संक्रामी तरतुदी

**अ-** (केवळ स्थायी वरिष्ठ कर्मचारी वर्गाला लागू)

दि. ८ मार्च, १९१० चा मंडळाचा निर्णय क्र.६० आणि दि.२९ ऑक्टोबर, १९१८ चा निर्णय क्र.७६१ च्या अनुसार, पुढील सवलती मंजूर केलेल्या आहेत.

(१) मंडळाला, त्याच्या स्वेच्छाधिकारात, एखादा वर्गणीदार एकतर त्याच्या सेवानिवृत्तीच्या वेळी किंवा त्याच्या मृत्यूच्या वेळी अपवादात्मक स्थितीत दीर्घकालीन व मान्य सेवेत असल्यास, किंवा मंडळाच्या सेवेत असताना मृत्यू झाल्याच्या किंवा निधीवरील दावा निकालात काढण्यात आल्यापूर्वी मंडळाच्या अंशदानाच्या रकमेत वाढ करण्याचा अधिक (+) तो मंडळाच्या सेवेत रुजू झाल्याच्या दिनांका पासून त्याच्या वेतनाच्या ८ $^{1}/_{3}$ टक्के इतक्या दराने जी रक्कम वर्गणीदाराकडून अंशदान म्हणून देण्यात येते त्या रकमेपेक्षा अधिक नसणा-या रकमेवर व्याज देण्याचा अधिकार असेल.

(२) मंडळाच्या सेवेत असताना अपवादात्मक स्थितीत दीर्घकालीन आणि मान्य सेवेत असलेल्या एखाद्या वर्गणीदाराचा मृत्यू झाल्याच्या प्रसंगी आणि त्याच्या बाबत मंडळाने पूर्वगामी स्वेच्छाधिकार वापरल्याच्या प्रसंगी, मंडळाने वाढलेल्या अंशदानाची आणि दिलेल्या व्याजाची रक्कम, भविष्य निर्वाह निधी नियमांच्या सर्व प्रयोजनांकरिता, वर्गणीदाराच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा असणा-या शिल्लक रकमेचा घटक भाग असल्याचे मानले जाईल.

टीप: अपवादात्मक स्थितीत "दीर्घकालीन सेवा" याचा अर्थ, विशेष रजे व्यतिरिक्त अन्य रजा वगळून किमान २५ वर्षांची प्रत्यक्ष सेवा, असा आहे.

**ब** - मंडळाने, त्यांच्या निर्णय क्र.७०९ दि. १७ ऑगस्ट, १९२० अन्वये जे १ एप्रिल १९२० पूर्वी निवृत्तीवेतनासाठी किंवा प्रत्येक सेवा वर्षाकरिता एका महिन्याच्या पूर्णसेवा निवृत्तिवेतनासाठी पात्र होते आणि जे भविष्य निर्वाह निधीत सामील होऊन त्याबाबतचे त्यांचे हक्क सोडून दिले अशा भविष्य निर्वाह निधीकडे दाखल झालेल्या सर्व स्थायी कनिष्ठ नोकरांना पुढील सवलती दिलेल्या आहेत.

१ एप्रिल १९२० पूर्वी अखंडित सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी, कमाल ३० वर्षांच्या एकूण सेवेपर्यंत, मंडळाच्या वर्गणीदाराच्या भविष्य निर्वाह निधी मध्ये त्याच्या मृत्यू समयी किंवा सेवानिवृत्तीच्या वेळी, खाली नमूद केलेल्या शर्तींच्या आधीन राहून, १ एप्रिल, १९२० रोजी असलेल्या एक महिन्याच्या वेतना इतक्या रकमेचे अंशदान देईल:-

(१) अतिकालिक वेतन वगळून मासिक दराने परिगणित करण्यात येईल.

(२) विशेष अंशदानावर व्याज मिळणार नाही.

(३) पुढील कोणत्याही कर्मचा-याबाबत विशेष अंशदान जमा केले जाणार नाही,-
(क) जो मंडळाच्या संमतीने आणि मान्यतेने अशी सेवानिवृत्ती घेत असल्याखेरीज वयाची ५५ वर्षे पूर्ण करण्यापूर्वी स्वेच्छेने निवृत्त होतो, किंवा

(ख)पुढील विशेष परिस्थितीं व्यतिरिक्त ज्याने १० वर्षांपेक्षा कमी वर्षे सेवा केली असेल असा आणि परंतु त्याने सर्वसाधारणपणे अर्हताकारी सेवेची दहा वर्षे पूर्ण केलेली असावीत.

(एक) मृत्यू झाल्यास किंवा आस्थापनेच्या कपातीच्या परिणामी कार्यमुक्त केल्यास किंवा वैद्यकीय कारणांवरून (कर्मचा-याच्या स्वतःच्या कसुरीमुळे नाही) अयोग्यता प्रमाणपत्र मिळाल्यास असे विशेष अंशदान देता येईल. हे अंशदान, सर्वसाधारणपणे, सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी अर्ध्या महिन्याच्या वेतना इतके किंवा एकूण सहा महिन्यांच्या वेतना इतके मर्यादित असेल परंतु, हे विशेष प्रकरणांमध्ये जेथे परिस्थिती बाबत समर्थन करण्यात येत असेल तेथे एक समान कमाल मर्यादेच्या अधीन राहून सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी हे अंशदान एका पूर्ण महिन्याच्या वेतने इतके वाढविता येईल.

<u>टीप:</u> या नियमांच्या प्रयोजनाकरिता, अनुपस्थितीची अधिकृत रजा, सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी (नैमित्तिक रजा वगळून) एक महिन्याच्या कमाल कालावधीपर्यंत अखंडित सेवा म्हणून गणण्यात येईल.

**क** - जे १ एप्रिल, १९२० पूर्वी प्रत्येक सेवावर्षासाठी अर्ध्या महिन्याच्या वेतना इतक्या पूर्णसेवा निवृत्तिवेतनाकरिता पात्र होते, अशा सर्व अस्थायी कर्मचा-यांना, त्यांच्या उपदान हक्काच्या ऐवजी त्यांच्या पूर्वीच्या अखंडित सेवेबाबत मंडळाकडून एक विशेष अंशदान देण्यात येईल आणि याची परिगणना पुढील प्रमाणे करण्यात येईल:-

१ एप्रिल, १९२० पूर्वीच्या अखंडीत सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी, एकूण सेवेच्या कमाल ३० वर्षांपर्यंत मंडळ, कर्मचा-याचा मृत्यू झाल्यावर किंवा तो सेवानिवृत्त झाल्यावर कर्मचारी भविष्य निर्वाह निधी मध्ये, खाली नमूद केलेल्या शर्तींना अधीन राहून, १ एप्रिल, १९२० रोजी असल्याप्रमाणे अर्ध्या महिन्याच्या वेतनाच्या रकमे इतक्या समान रकमेचे अंशदान देईल:

(१) रोजंदारीवरील कर्मचा-याबाबत, वेतन महिन्यातील २६ दिवसांप्रमाणे परिगणित करण्यात येईल.

(२) मासिक रोजंदारीवरील कर्मचा-याबाबत, वेतन हे अतिकालिक वेतन वगळून मासिक दराने परिमाणीत करण्यात येईल.

(३) विशेष अंशदानावर व्याज मिळणार नाही.

(४) विशेष अंशदान, पुढील कर्मचा-याबाबत जमा केले जाणार नाही:-

(क) त्याच्या विभाग प्रमुखाच्या संमतीने आणि मान्यतेने अशी सेवानिवृत्ती घेतली असल्याखेरीज ज्याने वयाची ५५ वर्षे पूर्ण करण्यापूर्वी स्वेच्छेने सेवानिवृत्ती घेतली असेल; किंवा

(ख) पुढील विशेष परिस्थिती खेरीज ज्याने १५ वर्षांची सेवा पूर्ण केली आहे आणि परंतु ज्याने सर्वसाधारणपणे १५ वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण केली असेल;

(एक) मृत्यू झाल्यास किंवा आस्थापनेच्या कपातीच्या परीणामी कार्यमुक्त केल्यास किंवा वैद्यकीय कारणांवरून (कर्मचा-याच्या स्वत:च्या कसुरीमुळे नाही) अयोग्यता प्रमाणपत्र मिळाल्यास असे विशेष अंशदान देता येईल; हे अंशदान सर्वसाधारणपणे सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी अर्ध्या महिन्याच्या वेतना इतके किंवा एकूण सहा महिन्यांच्या वेतना इतके मर्यादित असेल परंतु, विशेष प्रकरणांमध्ये जेथे परिस्थिती बाबत समर्थन करण्यात येत असेल तेथे एक समान कमाल मर्यादेच्या अधीन राहून सेवेच्या प्रत्येक वर्षासाठी एका पूर्ण महिन्याच्या वेतना इतके वाढविता येईल.

<u>टीप:</u> या तरतुदीच्या प्रयोजनाकरिता, अखंडीत सेवा याचा अर्थ, वेतनपटात नोंद केलेली प्रत्यक्ष सेवा, असा आहे आणि यात परवानगीसह अनुपस्थितीचा समावेश होतो. कोणत्याही प्रकाराची रजा ही, विश्वस्त मंडळ सारसंग्रह १७वी आवृत्ती याच्या अनुच्छेद ६७ अन्वये इजाविषयक रजा वगळून, सेवा म्हणून समजण्यात येणार नाही.

---------

<u>परिशिष्ट ’एच’</u>

[नियम ८ क(२)]

<u>नमुना ‘क’</u>

प्रति,

वित्तीय सल्लागार,
मुख्य लेखा अधिकारी,
मुंबई पोर्ट ट्रस्ट.

मार्फत: _______________, मुंबई पोर्ट ट्रस्ट.

महोदय,

विषय: ऐच्छिक भविष्य निर्वाह निधी योजनेबाबत.

-------------

मी विनंती करतो की, विश्वस्त मंडळ भविष्य निर्वाह निधी नियमांच्या नियम (क) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे दरमहा रूपये ________ चे ऐच्छिक भविष्य निर्वाह निधी अंशदान देण्याची मला अनुमती देण्यात यावी.

१९_________ या वर्षाच्या _______ महिन्यामध्ये देय असलेल्या माझ्या वेतनातून १९_________ पासून या बाबतच्या वजावटीस प्रारंभ करण्यात यावी.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा)

ठिकाण:
दिनांक:

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | : | |
| २) | पदनाम | : | |
| ३) | भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक | : | |
| ४) | वेतनश्रेणी व दरमाह वेतन | : | |
| ५) | दरमहा मिळणारा महागाई भत्ता | : | |
| ६) | ज्या वेतनपटावर वेतन काढण्यात येते त्याचे नाव | : | |

टीप: रक्कम केवळ पूर्ण रूपयातच असावी.

क्र.________

मुंबई पोर्ट ट्रस्टच्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, यांच्याकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले.

विभाग प्रमुख

परिशिष्ट 'ज'

[नियम ८ क(४)]

नमुना 'ख'

प्रति,
वित्तीय सल्लागार व
मुख्य लेखा अधिकारी,
मुंबई पोर्ट ट्रस्ट.

यांचेमार्फत: _______________, मुंबई पोर्ट ट्रस्ट.

महोदय,

विषय: ऐच्छिक भविष्य निर्वाह निधी योजना.

-------------

मी, सध्या ऐच्छिक भविष्य निर्वाह निधीमध्ये दरमहा रूपये ________ चे अंशदान देत आहे. मी अशी विनंती करतो की, पुढील वित्तीय वर्षापासून मार्च ______ च्या एप्रिल १९_____ मध्ये प्रदान केलेल्या वेतनातून मला, वरील अंशदान बंद करण्याची/त्यात दरमहा रूपये _______ इतक्या रकमेने बदल करण्याची अनुमती देण्यात यावी.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा)

ठिकाण:
दिनांक:

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपूर्ण नाव | : | |
| २) | पदनाम | : | |
| ३) | भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक | : | |
| ४) | वेतनश्रेणी व दरमाह वेतन | : | |
| ५) | दरमहा मिळणारे महागाई वेतन | : | |
| ६) | ज्या वेतनपटावर वेतन काढण्यात येते त्याचे नाव | : | |

टीप: रक्कम केवळ पूर्ण रूपयातच असावी.

क्र.________

मुंबई पोर्ट ट्रस्टच्या वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, यांच्याकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले.

विभाग प्रमुख

परिशिष्ट 'झ'

[नियम २१(२)]

मुंबई पोर्ट ट्रस्ट

प्रति,
वित्तीय सल्लागार व
मुख्य लेखा अधिकारी,
मुंबई पोर्ट ट्रस्ट.

(मार्फत ________________)

मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधी नियमांच्या नियम २१(२) च्या संदर्भात, मी याद्वारे ___________ या विश्वस्त मंडळाच्या सेवेतील माझ्या अंतिम सेवा निवृत्तिच्या दिनांकास उक्त निधीत माझ्या जमा खाती असेल अशी संपूर्ण रक्कम पाच वर्षांच्या ठराविक कालावधीकरिता ठेव म्हणून भविष्य निर्वाह निधीत ठेवण्याचा माझा उद्देश सूचित करीत आहे. वरील नियमांच्या तरतुदींची मला व्यवस्थितपणे माहिती आहे आणि त्यांचे पालन करण्यास माझी तयारी आहे. मला हे देखील माहित आहे की, या नोटिशीवर आपणाकडून एकदा कार्यवाही करण्यात आल्यावर त्यानंतर कोणत्याही वेळी कोणत्याही बाबतीत मला रक्कम काढता येणार नाही किंवा त्यात बदल करता येणार नाही.

आपला विश्वासू,

(स्वाक्षरी किंवा अंगठयाचा ठसा)

दिनांक:
अर्जदाराचे संपूर्ण नाव: ________________
पदनाम:________________
भविष्य निर्वाह निधी खाते क्रमांक: ________________
सेवा निवृत्तीचा अंतिम दिनांक: ________________
संपूर्ण पत्ता : ________________
________________

---

क्र.________ दिनांक:____________

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांच्याकडे पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी पाठविण्यात आले.

विभाग प्रमुख

परिशिष्ट 'ञ'
[नियम १९(८)]

प्रति,

वित्तीय सल्लागार व
मुख्य लेखा अधिकारी,
मुंबई पोर्ट ट्रस्ट.

यांचेमार्फत: ______________, मुंबई पोर्ट ट्रस्ट.

महोदय,

विषय: घर बांधण्याच्या अणि निवासी सदनिका खरेदी करण्याच्या प्रयोजनार्थ भविष्य निर्वाह निधीतून रक्कम काढणे.

------------

सदनिका खरेदी करण्याच्या किंवा जागेच्या किमतीसह योग्य असे घर संपादित करण्याच्या किंवा बांधण्याच्या प्रयोजनार्थ मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधी नियमावलीतील नियम १९३ च्या तरतुदी अन्वये, माझ्या मुंबई पोर्ट ट्रस्ट भविष्य निर्वाह निधीच्या जमा खाती शिल्लक असणा-या रकमेतून रूपये ________ (रूपये अक्षरी ________ फक्त) इतकी रक्कम काढण्याबाबत परवानगी देण्याची माझी विनंती अध्यक्षांनी विचारात घेऊन त्यास मान्यता दिलेली आहे. मी याद्वारे, त्यामध्ये अंतर्भत असलेल्या पुढील अटी व शर्ती या जेथवर मला लागू असतील तेथवर, मी त्यांचे पालन करीन व त्यांची पूर्तता करीन; त्या अशा-

(एक) जागेसह योग्य ते घर बांधण्याच्या किंवा संपादित करण्याच्या किंवा एक निवासी सदनिका खरेदी करण्याच्या प्रयोजनार्थ जेवढी रक्कम काढण्याकरिता अर्ज केला असेल तेवढया रकमेचा मी प्रत्यक्ष वापर करीन.

(दोन) जागेच्या खर्चासह योग्य असे घर बांधण्यासाठी किंवा संपादन करण्यासाठी किंवा सदनिका खरेदी करण्याच्या प्रयोजनार्थ मी प्रत्यक्ष केलेल्या खर्चापेक्षा जर अशा प्रकारे रक्कम काढावयास परवानगी दिलेली रक्कम अधिक असेल तर, ही अधिक रक्कम, मग त्या रकमेची मागणी करण्यात आलेली असो किंवा नसो कोणतीही हरकत न घेता एका ठोक रकमेच्या स्वरूपात तात्काळ भविष्य निर्वाह निधीतील माझे अंशदान जमा करण्याच्या रकमेतून मी परत करीन;

(तीन) अशा प्रकारे काढण्यात अलेल्या रकमेतून माझ्याकडून बांधावयाचे किंवा संपादित करावयाचे प्रस्तावित केलेले घर, किंवा अशा प्रकारे काढण्यात आलेल्या रकमेतून माझ्याकडून खरेदी करावयाची प्रस्तावित केलेली सदनिका ही बृहन्मुंबईच्या सीमांमध्ये स्थित असेल किंवा मी सेवेतून निवृत्त झाल्यानंतर माझा जेथे राहण्याचा हेतू असेल त्या ठिकाणी स्थित असेल;

(चार) मला घर बंधावयाचे असल्यास, उक्त रक्कम काढल्यापासून ६ महिन्यांच्या आत घराचे बांधकाम सुरू करण्यात येईल आणि घराचे बाधकाम सुरू झाल्याच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीत किंवा मला परवानगी देण्यात येईल अशा वाढीव कालावधी मध्ये पूर्ण करण्यात येईल. तयार घर खरेदी करावयाचे असल्यास अशा खरेदीसाठी पूर्वी माझ्याकडून खाजगी संस्थांकडून घेण्यात आलेल्या कोणत्याही कर्जाची अशी रक्कम काढण्याच्या ३ महिन्यांच्या आत परतफेड करण्यात येईल. मला निवासी सदनिका खरेदी करायची असल्यास अशी रक्कम काढल्याच्या तीन महिन्यांच्या आत, ती रक्कम चुकती करण्यात येईल;

(पाच) माझे घर बांधण्याच्या प्रसंगी ज्या जागेवर घर बाधावयाचे प्रस्तावित केले आहे त्या जागेवर घर बांधण्या बाबतचा हक्क मी तात्काळ संपादित करीन;

(सहा) आवश्यक त्या मर्यादेपर्यंत इमारतीचे साहित्य खरेदी करण्यासाठी स्थानिक प्राधिकरणाकडील आवश्यक असणारे मान्य केलेले आराखडे व परवाने माझ्याकडून सादर करण्यात येतील;

(सात) बांधलेले तयार घर विकत घेण्यासाठी रक्कम काढली असल्याच्या प्रसंगी, घराचा मालकी हक्क वादास्पद नसल्याची आणि ज्या जमिनीवर घर बांधले आहे त्या जमिनीची किंमत चुकती केली आहे याची खरेदी करण्यापूर्वी मी खात्री करून घेईन. निवासी सदनिका खरेदीसाठी रक्कम काढली असण्याच्या प्रसंगी मी खरेदी करणा-यानी स्थापन केलेल्या इमारतीतील सदनिका एखाद्या मर्यादित कंपनीचा, सहकारी गृहनिर्माण संस्थेचा किंवा कोणत्याही इतर विधिद्वारे संस्थापित संस्थेचा (कायद्याद्वारे मान्यताप्राप्त) सदस्य होईल;

(आठ) अशा प्रकारे बाधलेले किंवा संपादित केलेले घर किंवा खरेदी केलेली निवासी सदनिका संपूर्णपणे माझ्या मालकीची आहे आणि माझ्या ताब्यात आहे

याबाबत, असे जोपर्यंत मी नोकरीत राहीन तोपर्यंत, मी १एप्रिल रोजी किंवा त्यापूर्वी विहित नमुन्यात दरवर्षी एक प्रतिज्ञापत्र सादर करीन;

(नऊ) अशा प्रकारे बांधण्यात आलेले किंवा संपादित केलेले घर किंवा खरेदी केलेली निवासी सदनिका, सेवेत असताना माझ्याकडून गहाण, हस्तांतरण, विक्री, बक्षीस, अदलाबदल किंवा भाडेपट्टयाने देने या मार्गाने हस्तांतरित करण्यात येणार नाही.

मी याद्वारे असे घोषित करतो की, मला काढण्याची अनुमती दिलेल्या रकमेसह माझ्या वैयक्तिक बचतीची रक्कम, प्रस्तावित केलेल्या प्रकारचे घर बाधण्यासाठी किंवा संपादित करण्यासाठी किंवा निवासी सदनिका खरेदी करण्यासाठी पुरेशी असेल आणि बृहन्मुंबईच्या सीमांमध्ये किंवा माझ्या सेवानिवृत्तीनंतर माझा हेतू असलेल्या निवासाचे ठिकाणी बांधावयाचा किंवा संपादित करावयाचे किंवा खरेदी करण्याचा हेतू असलेल्या एका घराशिवाय कोणतेही घर किंवा निवासी सदनिका माझ्या मालकीचे नाही. मी आणखी असे घोषित करतो की, भविष्य निर्वाह निधी नियमाच्या तरतुदीनुसार जर मी घर खरेदी केले नाही किंवा बांधले नाही किंवा सदनिका संपादित केली नाही किंवा जर मी पूर्वोक्त अटी व शर्तीपैकी कोणत्याही अटींचा व शर्तींचा भंग केल्यास, मी, उक्त नियमांनुसार निधीतील माझ्या खाती जमा असलेल्या रकमेतून काढण्यास अनुमती दिलेल्या संपूर्ण रकमेची परतफेड करीन.

दिनांक ____________ महिना ____________ वर्ष ____________

ठिकाण ____________ स्वाक्षरी ____________

--------------